# २७ व्या विस्तार शिक्षण परिषद बैठकीचा इतिवृतांत

विस्तार शिक्षण परिषदेची २७ वी बैठक दि १६ मे, २०१९ रोजी सकाळी ११.०० वा कृषि जागर सभागृह, शेतकरी सदन, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला येथे आयोजित करण्यात आली. या सभेस उपस्थित असलेल्या सभासदांची यादी **प्रपत्र-१** वर देण्यात आली आहे. मा. डॉ. व्ही. एम. भाले, कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सभेचा सविस्तर ईतिवृत्तांत खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

सभेच्या सुरुवातीला सन्माननिय अध्यक्ष तसेच व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन प्रभारी संचालक विस्तार शिक्षण तथा सदस्य सचिव यांनी स्वागत केले व तदद्वतच अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने सभेची कार्यवाही सुरु केली. विषय पत्रिका टिप्पणी नुसार दि. २९ मे, २०१८ रोजी पार पडलेल्या २६ व्या विस्तार शिक्षण परिषद बैठकीचे इतिवृत्त, बैठकीमध्ये घेण्यात आलेले निर्णय व निर्णयानुसार झालेल्या कार्यवाहीचे वाचन करण्यात आले व त्यास सभागृहाने एकमताने मान्यता प्रदान केली.

डॉ. एन. एम. काळे, प्रभारी संचालक विस्तार शिक्षण तथा सदस्य सचिव यांनी सन २०१८-१९ मध्ये आयोजित विस्तार शिक्षण कार्यक्रमाबाबतचे तसेच सन २०१९-२० मध्ये प्रस्तावित विस्तार शिक्षण कार्यक्रमांचे सविस्तर सादरीकरण केले व सभागृहाने त्यास मान्यता दिली. या सभेमध्ये काही विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | निर्णय | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | विद्यापीठ मुद्रणालयामध्ये अद्यावत सोई सुविधा निर्माण करून विद्यापीठाचे छपाईची कामे मुद्रणालयात करण्यात यावी. | प्रभारी अधिकारी, विद्यापीठ मुद्रणालय, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| २ | शेतकऱ्यांचे यशोगाथाचे पुस्तक मराठी भाषेत तयार करावे. | • प्रमुख संपादक, विशिसं, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्रे |
| ३ | कृषि संवादीनीच्या विक्रीकरीता सर्वतोपरी प्रयत्न करावेत. | • प्रमुख संपादक, विशिसं, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्रे (सर्व) |
| ४ | विद्यापीठाच्या संपर्कात असणाऱ्या यशस्वी शेतकऱ्यांचे 'आयकॉन' सचित्र फ्लेक्स बोर्डद्वारे (संक्षिप्त यशोगाथा) अकोला मुख्यालयी व कृषि महाविद्यालय, नागपुर येथे दर्शनिय भागामध्ये लावण्यात यावे. | • विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, नागपूर |
| ५ | गुलाबी बोंड अळीच्या निर्मुलणाकरीता विद्यापीठाद्वारे राबविण्यात आलेल्या कार्यक्रम व कार्यवाहीचा संपुर्ण अहवाल तयार करण्यात यावा. याकरीता संचालक विस्तार शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येऊन या समितीने अहवाल ३० जुन, २०१९ पुर्वी | • मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी, विशिसं, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• विस्तार कृषि विद्यावेत्ता, विशिसं, डॉ. पंदेकृवि, अकोला<br>• प्रमुख, पिक संरक्षण अधिकारी, किटकशास्त्र विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला |

| | | |
|---|---|---|
| | तयार करावा. | • कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्रे (सर्व)<br>• प्रमुख संपादक, विशिसं, डॉ. पंदेकृवि, अकोला (सचिव) |
| ६ | शिवार फेरी २०१९ करीता खरीप हंगामाच्या सुरूवातीस प्रात्यक्षिक क्षेत्रावरील पिकांचे नियोजन व्यवस्थित राहिल याची काळजी घ्यावी. | विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पंदेकृवि, अकोला व सर्व संबंधीत वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ |
| ७ | दत्तक गाव रेडवा येथे घेण्यात आलेले प्रात्यक्षिके व इतर कार्यक्रमाच्या प्रभावाचा अहवाल तयार करावा. | माहिती अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ८ | खारपाण पट्टयातील पिक पध्दतीमध्ये बदल घडवून आणण्याकरीता ज्वारी व इतर पिकांची प्रात्यक्षिके घेण्यात यावी. | सहसंशोधक, तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प, राष्ट्रीय कृषि विकास योजना, विस्तार कृषि विद्यावेत्ता व सर्व संबंधीत वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ |
| ९ | खरीप पुर्व कृषि मेळाव्याच्या वेळी भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली द्वारे सत्कार करण्यात आलेल्या विदर्भातील प्रयोगशील शेतकरी श्री. विजय इंगळे व श्री. पंढरी गुंजकर यांना बोलावून विद्यापीठाद्वारे सत्कार करण्यात यावा. | विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| १० | कृषि विज्ञान केंद्र अंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रथम रेषीय प्रात्यक्षिके, शेतकऱ्यांच्या शेतावरील चाचणी प्रयोग तसेच प्रशिक्षणांच्या प्रभावाचा अभ्यास करून त्याबाबतचा विश्लेषनात्मक अहवाल सादर करावा. | • कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्रे (सर्व)<br>• विस्तार शिक्षण संचालनालय, डॉ. पंदेकृवि, अकोला |

सभेच्या शेवटी अध्यक्ष महोदयांनी विस्तार शिक्षण संचालनालयाद्वारे राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रम आयोजनाबाबत व विस्तार शिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावी होण्याच्या दृष्टीने सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले.

डॉ. के. यु. बिडवे, प्रभारी अधिकारी, शेतकरी सदन यांनी सभेचे संचालन व आभार प्रदर्शन केले.

संचालक विस्तार शिक्षण

अध्यक्ष
विस्तार शिक्षण परिषद तथा
कुलगुरू, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला

प्रपत्र - १

## २७ वी विस्तार शिक्षण परिषद बैठकीत उपस्थित सभासदांची यादी

| अ.क्र. | सहभागी सभासदांची नावे | पद नाम |
|---|---|---|
| १ | डॉ. व्ही. एम. भाले | मा. कुलगुरु व अध्यक्ष |
| २ | डॉ. एन. एम. काळे | संचालक, विस्तार शिक्षण (प्रभारी) |
| ३ | डॉ. आर. एन. काटकर | संचालक संशोधन यांचे प्रतिनिधी |
| ४ | श्री. एस. एस. साळवे | कृषि विकास अधिकारी, जि.प., बुलढाणा यांचे प्रतिनिधी |
| ५ | श्री. त्र्यंबकराव जायले | प्रगतशिल शेतकरी तथा स्विकृत सदस्य |
| ६ | डॉ. व्ही. एस. टेकाळे | विभाग प्रमुख, विस्तार शिक्षण तथा सदस्य |
| ७ | डॉ. पी. के. वाकळे | विशेष कार्य अधिकारी, कुलगुरू कार्यालय तथा आमंत्रित |
| ८ | डॉ. व्हि. ए. खडसे | विस्तार कृषि विद्यावेत्ता तथा आमंत्रित |
| ९ | श्री. आर. एल. ईसाळ | सहयोगी प्राध्यापक, विस्तार शिक्षण संचालनालय तथा आमंत्रित |
| १० | श्री. एस. पी. सलामे | मुख्य संपादक, विशिसं तथा आमंत्रित |
| ११ | डॉ. के. टी. लहरिया | विस्तार प्रशिक्षण अधिकारी, विशिसं तथा आमंत्रित |
| १२ | डॉ. के. यु. बिडवे | प्रभारी आधिकारी, शेतकरी सदन तथा आमंत्रित |
| १३ | डॉ. एस. डी. मोरे | प्रभारी अधिकारी, विद्यापीठ मुद्रणालय तथा आमंत्रित |
| १४ | श्री. डी. एस. देवपुजारी | प्रभारी अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र |
| १५ | श्री. एम. पी. शिंदे | कनिष्ठ संशोधन सहाय्यक |